**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ९८६/२०१९ मधील निशाणी क्र. २१ वरील आदेश</u>**

प्रस्तूतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरील प्रतिवादी क्र. ४ ते ७ तर्फे म्हणणे दाखल केले. निशाणी क्र.४७ कडील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. वादीने असे कथन केले की, प्रस्तुतचा दावा हा तहसिलदार, खटाव यांची दिनांक ०५/०७/२०१९ रोजीचा रस्ता केस कामी झालेला निकाल बेकायदेशीर असल्याचे जाहीर होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. परंतू दरम्यानचे कालावधीत प्रतिवादी क्र.३ ने प्रतिवादी क्र.४ ते ७ च्या मदतीने दावा मिळकत गट क्र.१ चे तीन तुकडे करुन बेकायदेशीरपणे रस्ता तयार केलेला आहे आणि त्यामुळे वादीचे नुकसान झालेले आहे. या कारणाने त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करुन रस्ता ज्या ठिकाणी केलेला आहे त्या ठिकाणी पुर्ववत करुन मिळणेसाठी व नुकसान भरपाई रु.५०,०००/– मिळणेसाठी विनंती कलमात दुरुस्ती करणे तसेच कलम २अ म्हणून नव्याने रस्ता केल्याचे नमुद करणे आवश्यक आहे. तसेच त्या अनुषंगाने दाव्याचे मुल्यांकन कलमात देखील दुरुस्ती करणे गरजेचे आहे. या कारणाने वादीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

४. प्रतिवादीतर्फे असे कथन केले की, दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार असून परस्पर विरोधी कथने वादीस करता येणार नाहीत. तसेच तहसिलदार यांनी दिलेला निकाल वादीवर बंधनकारक आहे. त्या आदेशाची अंमलबजावणी पूर्वीच झालेली आहे. या कारणांवरुन प्रतिवादींनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

५. वादीने तहसिलदार यांचा दिनांक ०५/०७/२०१९ रोजीचा रस्ता केस मधील आदेश बेकायदेशीर असल्याचे जाहीर होवून मिळणेची विनंती केली आहे. वादीच्या कथनानुसार दावा प्रलंबीत असताना त्या आदेशान्वये रस्ता करण्यात आलेला आहे. सदरहू बाब प्रतिवादींनी नाकारलेली नाही. त्यांनी दाव्याचे पूर्वीच रस्ता झालेल्याचे कथन केलेले नाही. अशा वेळी वादी हा यदाकदाचीत तहसिलदार यांचा आदेश बेकायदेशीर असल्याचे शाबीत झाल्यास वाद मिळकत पूर्ववत करुन मिळण्यास व नुकसार भरपाई मिळण्याची मागणी करण्यास पात्र आहे या कारणाने दावा प्रलंबीत असताना घडलेल्या घडामोडी विचारात घेता अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे.

६. प्रतिवादींना वादीने दावा दुरुस्ती केल्यानंतर त्यांची बाजू मांडण्यास संधी मिळणार आहे. त्यामुळे प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. सदरहू दुरुस्तीमुळे वादी व प्रतिवादी यांचेतील वाद प्रश्नांचा कायमस्वरुपी निपटारा होणेस मदत होणार आहे. इत्यादी कारणांवरुन मी पुढील आदेश पारित करतो.

## **<u>आ दे श</u>**

१. निशाणी क्र. ३१ कडील अर्ज खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे पुढील तारखेस दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याच्या प्रती प्रतिवादींना द्याव्यात.

ठिकाण – वडूज
दिनांक – १२.११.२०२१

(के. सी. माने)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, वडूज